FORM-1A

N.C.R.B.

I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154209

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई शहर, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि., पहिली खबर क्र. FIR No. 01, वर्ष Year 2022, दिनांक Date 05/01/2022
2. (i) अधिनियम Act प्र.प्र.अ. 1988, कलमे Sections 7
   (ii) अधिनियम Act ......, कलमे Sections ......
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ......
3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day मंगळवार, तारीख पासून Date from 07/12/2021 वेळ Time 16:00, तारीख पर्यंत Date to 04/01/22 वेळ Time 16:17
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 07/12/2021, वेळ Time 16:00
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 01/2022, तारीख Date 05/01/2022 वेळ Time 06:40
4. माहितीचा प्रकार Type of Information : प्रत्यक्ष, लेखी / तोंडी Written / Oral लेखी
5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा उत्तरेस 9 km, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ......
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name सह संचालक व्यवसाय शिक्षण व प्रशासन प्रादेशिक कार्यालय खेरवाडी वांद्रा (पू) मुंबई, ठिकाणाचे नंबर No. if any ......, गल्ली Ward ......, रस्त्याचे नाव Name of road ......
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ......, गाव Village ......, पोस्ट Post ......, तालुका Taluka ......, जिल्हा Dist. ......, राज्य State ......
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station निर्मल नगर पो. ठा., तालुका Taluka अंधेरी जिल्हा Dist. मुंबई, राज्य State महाराष्ट्र
6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name दिपक अर्जुनद टेकचंदानी  (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name अर्जुनद टेउमल टेकचंदानी
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 29/01/1963  (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9820044525
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. Z-4352406 दिल्याचा दिनांक Date of Issue 11/08/2017 दिल्याचे ठिकाण Place of Issue मुंबई (f) व्यवसाय Occupation ......
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste सिंधी, जनजात Sub-Caste सिंधी
   (h) पत्ता Address : ......, गल्ली / सर्व्हे नं. Ward ......, घर / नाव नं. House/Name No. ......, फोन / मो. नं. Phone/Mo. No. ......, पॅन नं. PAN No. ......, वोटर्स नं. Card No. ......
   रस्त्याचे नाव Road रो. 101, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place अनुमोल टॉवर, गाव Village S.V. रोड, पोस्ट Post ......, पो. स्टे. P. Stn. ......
   तालुका Taluka गोरेगाव, जिल्हा Dist. मुंबई शहर, राज्य State महाराष्ट्र, सध्याचा पत्ता Present Address ......
7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

   श्री अनिल मदन श्री जाधव, अध्यक्ष महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळ आणि अति कार्यकार सहसंचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण सेवा कार्यालय प्रादेशिक कार्यालय वांद्रा पूर्व मुंबई 51 ... शासकिय वसाहत वांद्रा पूर्व मुंबई 51,

यातिल फिर्यादी श्री दिपक श्रीचंद टेकचंदानी वय 58 वर्षे रा. श्री / 101 अनमोल टॉवर, एस. वी. रोड पेटल पेट्रोलपंपच्या समोर गोरेगांव (प) मुंबई 62, यांचा स्वलेम पानावर जबाब नोंद करण्यात आला असुन तिच गुन्ह्याची प्रथम खबर म्हणुन संबोधण्यात येत आहे.

समक्ष

05/01/2022

अनुप्रिया नेटे
पोलिस निरीक्षक
लाप्रवि मुंबई

Deepak

फिर्याद दिनांक – ०५/०१/२०२२

मी दिपक श्रीचंद टेकचंदानी, वय ५८ वर्षे, धंदा–हेल्थकेअर संबंधी व्यवसाय, रा.ठी. सी/१०१, अनमोल टॉवर, एस.व्ही. रोड, पटेल पेट्रोलपंपच्या समोर, गोरगांव(पश्चिम), मुंबई–४०००६२, मो.क्र. ९८२००४४५२५, आधार कार्ड नं. ९२६८७५१६२२१०, पॅन न. ACCPT6313R, पासपोर्ट नं. Z-435246, प्राप्त दि. ११/०८/२०१७, वैधता दि. १०/०८/२०२७

---------

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर माझे कटुंबियांसह गेल्या १५ वर्षापासुन राहतो. माझी पत्नी सौ. सोनिया हि डॉक्टर (त्वचारोग तज्ञ) असुन आमचे मालाड, अंधेरी व पुणे येथे क्लीनीक आहेत. त्याचेपासुन मिळणाऱ्या उत्पनावर आमचा उदरनिर्वाह चालतो.

माझी पत्नी डॉ. सोनिया व मी असे मिळुन भागीदारी मध्ये टेंडर स्कीन इंटरनॅशनल कॉस्मेटोलॉजी अॅकॅडमी या नावाने संस्थेची मान्यता व त्याअंतर्गत विविध कोर्स सुरु करण्याकरीता मी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळाकडे परवानगी मिळणेबाबत दि. ७ जुन २०२१ रोजी ऑन लाईन अर्ज केला होता. सदर बाबत मी सर्व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर ८ जुलै २०२१ रोजी मला सदर संस्थेची व विविध कोर्स करीता पुर्व परवानगी देण्यात आली होती. त्यानंतर इतर सर्व बाबींची पुर्तता करुन मी शासकीय फि संबधीत ट्रेझरीमध्ये भरली.

त्यानंतर सदर प्रकरणाची अंतिम मंजुरी मिळण्याकरीता सदरचे प्रकरण हे अध्यक्ष महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळ, तथा सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, वांद्रे (पुर्व), मुंबई यांचेकडे प्रलंबित होते. त्याबाबत मी डॉ. अनिल जाधव, अध्यक्ष महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळ यांना भेटलो असता त्यांनी सदर प्रकरणाचे अंतिम मंजुरीकरीता माझ्याकडे रु. ५,००,०००/– (अक्षरी रु. पाच लाख फक्त) लाचेची मागणी केली. सदरची लाचेची रक्कम मला दयावयाची नसल्याने मी दि. ०७/१२/२०२१ रोजी मा. अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांचेकडे डॉ. अनिल जाधव यांचेविरुध्द लेखी तक्रार दिली. त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे यांनी मला पुढे करण्यात येणाऱ्या कारवाईबाबत थोडक्यात माहिती सांगुन सदरची कारवाई दि. ०९/१२/२०२१ रोजी करण्यात येणार असल्याचे सांगितले.

दि. ०९/१२/२०२१ रोजी सकाळी १०.३० वाजता मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई कार्यालयात हजर झालो. त्यावेळी पो.नि. सुप्रिया नटे यांनी पोलीस पथकातील स.पो.आ. आबासाहेब पाटील, व दोन सरकारी पंच व पोलीस पथकाची माझेशी ओळख करुन दिली.

त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे यांनी मला सापळा कारवाई करण्यापुर्वी करावयाच्या पडताळणीची माहिती समजावुन सांगितली व कारवाईच्या दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे हया मला व दोन सरकारी पंचाना सोबत घेवून कार्यालयातील पहील्या माळयावरील गोपनीय कक्षामध्ये घेवून गेल्या तेथे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मायक्रो एस.डी. कार्ड मध्ये माझे, पो.नि. सुप्रिया नटे व दोन पंचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रित केले.

त्यानंतर मी, पो.नि. सुप्रिया नटे, स.पो.आ. पाटील दोन पंच व पडताळणी/सापळा कारवाई पथक असे पडताळणी/सापळा कारवाईकरीता लागणारे साधनसामुग्रीसह खाजगी वाहनांमधुन लोकसेवकास भेटण्यासाठी त्यांनी त्यांचे मोबाईल फोनद्वारे व्हॉट्अॅपवर पाठविलेल्या संदेशाप्रमाणे लिलावती हॉस्पीटल, बांद्रा, मुंबई च्या दिशेने गेलो. लिलावती हॉस्पीटलच्या अगोदर काही अंतरावर गेल्यावर पो.नि. सुप्रिया नटे यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तो मी परीधान केलेल्या कोटाच्या आतील शर्टाच्या डाव्या बाजुच्या वरील खिशात लावला. त्यांनंतर मी, व पंच श्री. राजेंद्र राऊत असे लोकसेवकास भेटण्यासाठी लिलावती हॉस्पीटलच्या ऑपरेशन थियटरचे प्रतिक्षालय

कक्षात जावुन भेट घेतली असता लोकसेवक डॉ. जाधव यांनी There is no fees for your course, I will close down Monday Issue, We will discuss and solve it. असे बोलून ऑफिसमें बैठके बात करते है। असे बोलले. त्यानंतर मी व पंच असे सापळा पथक ज्या ठिकाणी थांबले होते त्याठिकाणी आलो असता पो.नि. सुप्रिया नटे यांनी माझे जवळील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन त्यातील माझे व लोकसेवक यांचेतील संभाषण ऐकुन त्याची ट्रान्सक्रिप्ट तयार करून त्यांनी सदरची कारवाई स्थगीत केल्याचे सांगितले. सदर बाबत पो.नि. सुप्रिया नटे यांनी सविस्तर पंचनामा केलेला आहे.

त्यानंतर दि. १३/१२/२०२१ रोजी मी १३.०० वा. पो.नि. सुप्रिया नटे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी लाचलुपचत प्रतिबंधक विभाग कार्यालयात हजर झालो. त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे हया मला व दोन सरकारी पंचाना सोबत घेवून कार्यालयातील पहील्या माळयावरील गोपनीय कक्षामध्ये घेवून गेल्या तेथे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मायक्रो एस.डी. कार्ड मध्ये माझे, पो.नि. सुप्रिया नटे व दोन पंचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रित केले. त्यानंतर मी, पो.नि. सुप्रिया नटे, स.पो.आ. पाटील दोन पंच व पडताळणी/सापळा कारवाई पथक असे पडताळणी/सापळा कारवाईकरीता लागणारे साधनसामुग्रीसह खाजगी वाहनांमधुन लोकसेवकास भेटण्यासाठी त्यांचे कार्यालयाकडे रवाना झालो. कार्यालयापासुन काही अंतरावर खेरवाडी जंक्शन येथे सर्विस रोडवर जावुन थांबलो त्यावेळी पो.नि. सुप्रिया नटे, यांनी मला योग्य त्या सुचना देवून डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तो मी परीधान केलेल्या कोटाच्या आतील शर्टाच्या डाव्या बाजुच्या वरील खिशात लावला. त्यांनंतर मी, व पंच श्री. राजेंद्र राऊत असे लोकसेवकास भेटण्यासाठी त्यांचे कार्यालयत गेलो असता लोकसेवक जाधव हे मंत्रालय येथे गेले असल्याचे तेथे हजर असलेले कर्मचारी यांनी सांगितले. त्यानंतर मी व पंच असे सापळा पथक ज्या ठिकाणी थांबले होते त्याठिकाणी आलो असता पो.नि. सुप्रिया नटे यांनी माझे जवळील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन त्यातील माझे व लोकसेवक यांचेतील संभाषण ऐकुन त्याची ट्रान्सक्रिप्ट तयार करून त्यांनी सदरची कारवाई स्थगीत केल्याचे सांगितले. सदर बाबत पो.नि. सुप्रिया नटे यांनी सविस्तर पंचनामा–१ केलेला आहे.

त्यानंतर मी, पो.नि. सुप्रिया नटे यांना लोकसेवक श्री. जाधव हे कार्यालयीन वेळेनंतर देखील भेटत असल्याचे सांगितले त्यानुसार मी, पो.नि. सुप्रिया नटे, स.पो.आ. पाटील दोन पंच व पडताळणी/सापळा कारवाई पथक असे पडताळणी/सापळा कारवाईकरीता लागणारे साधनसामुग्रीसह खाजगी वाहनांमधुन लोकसेवकास भेटण्यासाठी त्यांचे कार्यालयाकडे रवाना झालो. कार्यालयापासुन काही अंतरावर खेरवाडी जंक्शन येथे सर्विस रोडवर जावुन थांबलो त्यावेळी पो.नि. सुप्रिया नटे, यांनी मला योग्य त्या सुचना देवून डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तो मी परीधान केलेल्या कोटाच्या आतील शर्टाच्या डाव्या बाजुच्या वरील खिशात लावला. त्यांनतर मी, व पंच श्री. राजेंद्र राऊत असे लोकसेवकास भेटण्यासाठी त्यांचे कार्यालयत गेलो असता तेथे लोकसेवक जाधव यांचेशी भेट झाली नाही. त्यानंतर काही वेळांत माझे मोबाईल फोन क्र. ९८२००४४५२५ वर लोकसेवक जाधव यांचे मोबाईल क्र.९३२३५८९४३७ वरुन वॉट्सअॅप मिस्ड कॉल आल्याचे मी पो.नि. सुप्रिया नटे यांना सांगितले. त्यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी माझे मोबाईल फोनवरुन लोकसेवक जाधव यांना व्हॉट्सअॅप कॉल करुन माझे मोबाईल फोनचा स्पिकर ऑन केला व सदरचा कॉल डीजीटल व्हॉईस रेकॉर्डवर ध्वनीमुद्रित करण्यात आला. त्यावेळी झालेल्या संभाषणात Tomorrow in the monring I am there, eleven O clock come down असे सांगितले. त्यानंतर मी व पंच असे सापळा पथक ज्या ठिकाणी थांबले होते त्याठिकाणी आलो असता पो.नि. सुप्रिया नटे यांनी माझे जवळील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन त्यातील माझे व लोकसेवक यांचेतील संभाषण ऐकुन पुन्हा लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी या कार्यालयामध्ये परत येवुन झालेल्या संभाषणाची ट्रान्सक्रिप्ट तयार करून

समक्ष

(सुप्रिया [illegible] नटे)
पोलीस निरीक्षक,
[illegible] प्रतिबंधक विभाग, मुं[illegible]

Deepak

त्यांनी सदरची कारवाई स्थगीत केल्याचे सांगितले. सदर बाबत पो.नि. सुप्रिया नटे यांनी सविस्तर पंचनामा–२ केलेला आहे.

त्यानंतर दि. १४/१२/२०२१ रोजी १०.०० वा. पो.नि. सुप्रिया नटे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयात हजर झालो. त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे हया मला व दोन सरकारी पंचाना सोबत घेवून कार्यालयातील पहील्या माळयावरील गोपनीय कक्षामध्ये घेवून गेल्या तेथे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मायक्रो एस.डी. कार्ड मध्ये माझे, पो.नि. सुप्रिया नटे व दोन पंचाचे वक्तव्य ध्वनीमुद्रित केले. त्यानंतर मी, पो.नि. सुप्रिया नटे, स.पो.आ. पाटील दोन पंच व पडताळणी/सापळा कारवाई पथक असे पडताळणी/सापळा कारवाईकरीता लागणारे साधनसामुग्रीसह खाजगी वाहनामधुन लोकसेवकास भेटण्यासाठी त्यांचे कार्यालयाकडे रवाना झालो. कार्यालयापासुन काही अंतरावर खेरवाडी जंक्शन येथे सर्विस रोडवर जावुन थांबलो त्यावेळी पो.नि. सुप्रिया नटे, यांनी मला योग्यत्या सुचना देवून डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तो मी परीधान केलेल्या कोटाच्या आतील शर्टाच्या डाव्या बाजुच्या वरील खिशात लावला. त्यानंतर मी, व पंच श्री. राजेंद्र राऊत असे लोकसेवकास भेटण्यासाठी त्यांचे कार्यालयत गेलो असता ते कामामध्ये व्यस्त होते त्यामुळे मी माझे मोबाईलद्वारे त्याच्याकार्यालया बाहेर असल्याचे त्याना कळविले असता सुरुवातीला त्यांनी मला व्हॉटस्अॅप मेसेजद्वारे कार्यालयाबाहेर थांबुन रहाण्यास सांगितले. त्यानंतर थोडया वेळाने त्यांच्या कार्यालयाचे शिपायाने माझे नाव घेवून बोलाविल्याने मी त्यांचे कार्यालयात गेलो. नमुद वेळी कार्यालयामध्ये असलेल्या शिपायाने माझे सोबतच्या पंच श्री. राऊत यांना कार्यालयाबाहेर थांबण्याचा इशारा केला. कार्यालयात झालेल्या समक्ष भेटी दरम्यान आमचे मध्ये माझ्या टेंडर स्कीन इंटरनॅशनल कॉस्मेटोलॉजी अॅकॅडमीच्या अंतिम परवानगी संदर्भातील प्रलंबित फाईल व कामाविषयी चर्चा झाली. नमुद चर्चे दरम्यान लोकसेवक जाधव यांनी माझ्या टेंडर स्कीन इंटरनॅशनल कॉस्मेटोलॉजी अॅकॅडमीच्या अंतिम परवानगीचे कामाकरीता त्यांचे उजव्या हाताचे पाच बोटे दाखवुन रु. पाच लाखाची लाचेची मागणी केली. नमुद वेळी मी त्याना five is very big असे म्हणून सदरची रक्कम मोठी असल्याचे सांगितले. परंतु लोकसेवक जाधव यांनी मला five is not big असे म्हणून सदरची रक्कम कमी असून it is a big opportunity असे म्हणाले. तसेच लोकसेवक जाधव यांनी दि. ०९/१२/२०२१ रोजी पडताळणी दरम्यान झालेल्या संभाषणामध्ये येणाऱ्या नवीन अॅक्ट नुसार नमुद कोर्ससाठी रु. दहा लाख फि शासनास भरावी लागणार आहे असे सांगितले. त्यानंतर मी व पंच असे सापळा पथक ज्या ठिकाणी थांबले होते त्याठिकाणी आलो असता पो.नि. सुप्रिया नटे यांनी माझे जवळील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन त्यातील माझे व लोकसेवक यांचेतील संभाषण ऐकले. त्यानंतर सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी या कार्यालयामध्ये परत येवुन झालेल्या संभाषणाची ट्रान्सक्रिप्ट तयार करून त्यांनी सदरची कारवाई स्थगीत केल्याचे सांगितले. सदर बाबत पो.नि. सुप्रिया नटे यांनी सविस्तर पंचनामा केलेला आहे.

दि. २०/१२/२०२१ रोजी ११.०० वा. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय येथे हजर झालो. व पो.नि. सुप्रिया नटे यांना भेटलो त्यानंतर लोकसेवक जाधव यांना फोन करुन भेटावयाचे ठरले. त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे हया मला व दोन सरकारी पंचाना सोबत घेवून कार्यालयातील पहील्या माळयावरील गोपनीय कक्षामध्ये घेवून गेल्या तेथे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मायक्रो एस.डी. कार्ड मध्ये माझे, पो.नि. सुप्रिया नटे व दोन पंचाचे वक्तव्य ध्वनीमुद्रित केले. त्यानंतर मी माझा मोबाईल क्र. ९८२००४४५२५ वरुन लोकसेवक जाधव यांचे मोबाईल क्र.९३२३५८९४३७ वर वॉट्सअॅप कॉल केला असता लोकसेवक जाधव यांनी ते मंत्रालयात असल्याचे सांगून I will call you, I will talk with you असे बोलले. त्यामुळे सदरची कारवाई स्थगीत केल्याचे पो.नि. सुप्रिया नटे यांनी सांगितले. सदर बाबत पो.नि. सुप्रिया नटे यांनी सविस्तर पंचनामा केलेला आहे.

दि. २९/१२/२०२१ रोजी १०.३० वा. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय येथे हजर झालो. यापुर्वी झालेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसवेक जाधव यानी दि. १४/१२/२०२१ रोजी मागणी केलेली रक्कम त्यांना केव्हा व कोठे दयावी याबाबत त्यांनी काहीही सांगितले नसल्यामुळे पुन्हा लोकसेवक जाधव याचेशी फोन वरुन संपर्क करता येईल असे मी सांगितले वरुन पो.नि. सुप्रिया नटे यांनी त्याबाबत पुढील सविस्तर पंचनामा कारवाई करण्यात येईल असे सांगितले त्यानुसार प्रथम दोन सरकारी पंचांसमक्ष वक्तव्य ध्वनीमुद्रित करुन त्यानंतर तक्रारदार यांचे मोबाईल फोनवर दोन व्हॉट्सअॅप कॉल केले सदर कॉल लोकसेवक जाधव यानी स्विकारले नाहीत. त्यानंतर साधारण अर्धा तासाच्या अंतराने लोकसेवक जाधव यांचे मोबाईलवरुन माझे मोबाईल फोनवर व्हॉट्सअॅप कॉल आला. सदरचा कॉल डिजीटल व्हॉईस रेकॉर्डवर ध्वनीमुद्रित करण्यात आला. नमुद संभाषणा दरम्यान लोकसेवक जाधव यांनी ते मंत्रालयात असल्याचे सांगून परत निघाल्यानंतर फोन करतील असे सांगितले. त्यामुळे सदरची कारवाई स्थगीत केल्याचे पो.नि. सुप्रिया नटे यांनी सांगितले. सदर बाबत पो.नि. सुप्रिया नटे यांनी सविस्तर पंचनामा केलेला आहे.

दि. ०४/०१/२०२२ रोजी सकाळी मी लोकसेवक जाधव यांचे मोबाईलवर हॅप्पीनेस मॉर्निंगचा मेसेज केला असता साधारण ११.२६ वाजण्याचे सुमारास त्यांनी माझे मोबाईल फोन वर व्हॉट्सअॅप कॉल करून मला दुपारनंतर त्यांचे कार्यालयात भेटावयास बोलावले. सदर बाबत मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालयात येवून पो.नि. सुप्रिया नटे यांना कळविले त्यामुळे पोनि सुप्रिया नटे यांनी सदर बाबत पुढील सापळापुर्व/सापळा कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती देवुन दोन पंच यांना बोलावले. त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे यांनी मला सापळापुर्व/सापळा कारवाई बाबतची माहिती समजावुन सांगितली व कारवाईच्या दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे हया मला व दोन सरकारी पंचाना सोबत घेवून कार्यालयातील पहील्या माळयावरील गोपनीय कक्षामध्ये गेल्या. तेथे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मायक्रो एस.डी. कार्ड मध्ये माझे, पो.नि. सुप्रिया नटे व दोन पंचांचे वक्तव्य ध्वनीमुद्रित केले. त्यानंतर मी, पंच व पो.नि. सुप्रिया नटे असे स.पो.आ. आबासाहेब पाटील यांचे दालनात आलो असता पो.नि. सुप्रिया नटे यांनी तेथे उपस्थीत असलेले पोलीस अंमलदार यांची ओळख श्री. दिनेश कावले अशी करुन दिली. त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे यांनी मला लोकसेवक जाधव यांना दयावयाचे रु. ५,००,०००/– ( अक्षरी रु. पाच लाख ) लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता एवढी रक्कम माझ्याकडे नसल्याचे त्यांना सांगितले व मी माझे कडील बचतीतील भारतीय चलनाच्या रु. २०००/– दराच्या ०६ नोटा, एकुण रु. १२०००/– (अक्षरी रु. बारा हजार) त्यांचेकडे दिले.

त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे यांनी त्यांचेकडे रू.२०००/– दराच्या खेळण्यातील बनावट नोटा रु. ४,८८,०००/– (अक्षरी चार लाख अठठ्यांऐंशी हजार फक्त) एकुण २४४ टॉय नोटा असल्याचे सांगुन ते लाचेकरीता वापरण्यात येणार असल्याचे सांगितले. पो.नि सुप्रिया नटे यांनी लोकसेवक जाधव यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर स.पो.आ. आबासाहेब पाटील यांचे मोबाईल फोनवर मिस्ड कॉल करुन पुर्वनियोजीत इशारा करावा असे मला सांगितले. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे आजुबाजुस थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले. त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे यांचे सुचनेनुसार तेथे हजर असलेले पो.ना.क्र. ०१०५७७/दिनेश कावले यांनी पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेस अॅंथ्रासीन पावडर लावली. त्यानंतर सदर लाचेची रक्कम तीन वेगवेगळया हिरवट निळसर रंगाच्या टेंडर स्कीन इंटरनॅशनल च्या कागदाचे पाकीटामध्ये अनुक्रमे

१) २,००,०००/– ( रु. २०००/– किमतीच्या भारतीय चलनाच्या दोन नोटा व ९८ टॉय नोटा )

समक्ष

(सुप्रिया [signature] नटे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुं.

[signature]

२) २,००,०००/– ( रु. २०००/– किमतीच्या भारतीय चलनाच्या दोन नोटा व ९८ टॉय नोटा ) व
३) १,००,०००/– (रु. २०००/– किमतीच्या भारतीय चलनाच्या दोन नोटा व ४८ टॉय नोटा ) अशा पध्दतीने ठेवली. त्यानंतर सदरचे तीन पाकीटे पो.ना. कावले यांनी अलगदपणे माझे पॅन्टचे डाव्या बाजुचे समोरील खिशात ठेवली व ते सापळा कारवाईत सहभाग घेणार नसल्याचे सांगितले.

त्यानंतर मी, दोन सरकारी पंच, पो.नि. सुप्रिया नटे, स.पो.आ. आबासाहेब पाटील व सापळा पथक असे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयाचे आवारात आलो तेथे उभे असलेल्या दोन शासकीय वाहने व माझे खाजगी वाहनात बसलो व वाहने निघण्यापुर्वी माझे खाजगी वाहन व एक सरकारी वाहन खेरवाडी जंक्शन बांद्रा पुर्व येथे तसेच दुसरे सरकारी वाहन व त्यातील पथक चेतना कॉलेज बांद्रा पुर्व येथे थांबतील असे सांगितले व त्यानंतर लोकसेवक जाधव यांना भेटण्याकरीता त्यांचे कार्यालयात जाणेकरीता रवाना झालो. व पो.नि. सुप्रिया नटे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी माझे खाजगी वाहन व एक सरकारी वाहन खेरवाडी जंक्शन, सर्विस रोडवर बांद्रा पुर्व, येथे येवून थांबलो. त्यानंतर पो.नि. सुप्रिया नटे, यांनी मला योग्य त्या सुचना देवून डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तो मी परीधान केलेल्या कोटाच्या आतील शर्टाच्या डाव्या बाजुच्या वरील खिशात लावला. त्यानंतर मी, व पंच श्री. राजेंद्र राऊत असे लोकसेवकास भेटण्यासाठी त्यांचे कार्यालयत गेलो. व सापळा कारवाईतील पथक लोकसेवक यांचे कार्यालयाचे आजुबाजुचे परीसरात कोणसही संशय येणार नाही अशा रीतीने थांबुन राहीले. मी लोकसेवक जाधव यांची त्यांचे कक्षात भेट घेतली त्यावेळी माझे प्रकरणाबाबत त्यांचेशी चर्चा करुन त्यांना I have got your five lakhs cash असे बोललो असता त्यांनी OK असे म्हणाले. त्यानतर मी माझ्या पॅन्टच्या डाव्या खिशातील तीन पाकीटे काढुन दोन, दोन व एक लाख असे एकुण पाच लाख रुपये असल्याचे सागुन सदरचे पाकीटे हे त्यांच्या टेबलावर ठेवले त्यांनी ते पाकीटे त्यांच्या हातामध्ये घेवून त्यांच्या डाव्या बाजुला असलेल्या टेबलाच्या ड्रॉवरमध्ये ठेवले. त्यानंतर मी त्याना माझे प्रकरणाचे फाईल बाबत विचारले असता friday तक हो जाना चाहीये असे बोलले. त्यानंतर मी त्यांचे कार्यालयाचे बाहेर येवून स.पो.आ. आबासाहेब पाटील यांना त्यांचे मोबाईलवर माझे मोबाईल फोनद्वारे मिस्डकॉल करुन पुर्व नियोजित इशारा दिला. त्यानंतर सापळा पथकातील पोलीसांनी तात्काळ लोकसेवक जाधव यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडुन ताब्यात घेतले.

लोकसेवक डॉ. अनिल जाधव यांनी माझे टेंडर स्कीन इंटरनॅशनल कॉस्मेटोलॉजी अॅकॅडमी या नावाने संस्थेची मान्यता व त्याअंतर्गत विविध कोर्स सुरु करण्याकरीता अंतिम मंजुरी देण्याकीरता रु. ५,००,०००/– ( अक्षरी रु. पाच लाख फक्त) ची लाचेची मागणी करुन ती माझे कडुन स्विकारली म्हणुन माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझे, लोकसेवक डॉ. अनिल जाधव यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद संगणकावर मराठीत टंकलिखीत केली असून ती मी वाचून पाहीली असता माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष
(सुप्रिया नटे),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग,

Deepak

तक्रारदाराने / फिर्यादीने तकार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ तात्काळ

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

5,00,000/- त्यामध्ये रु. 2000/- च्या 6 भारतीय चलनी नोटा व रु. 2000/- च्या खेळण्यातील

(a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........ (245) नोटा

Total Value of properties stolen / involved ........ वरील प्रमाणे

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

1. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........ —

Unnatural / Accidental Death Case No., if any —

2. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required). Detail write down back blank page.

वरील नमुद तारीख वेळ व ठिकाणी फि. यांनी कॉलम 7 मधील आलोसे यांच्या कार्यालयामध्ये महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळ येथे ते भागीदार असलेल्या रेडर स्कील इंटरनॅशनल कॉस्मेटोलॉजी अकॅडमी व त्या अंतर्गत येणाऱ्या कोर्सच्या मंजुरी करीता सर्व कागदपत्रांची पुर्तता करून जुलै 2021 ये मंजुरी प्राप्त केली होती नमुद प्रकरणात अंतिम मंजुरी मिळणेकरीता वरील आलोसे यांनी रु. 10,000/- इतक्या लाचेची मागणी फिर्यादी यांचे कडे केली व दि 04/1/2022 रोजी सापळा कारवाई दरम्यान आलोसे यांनी रु. 5,00,000/- इतकी लाचेची रक्कम फिर्यादी यांचेकडुन स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले म्हणुन त्यांचे विरुद्ध भ्र. प्र. अ. 1988 कलम 7 अन्वये गुन्हा नोंद

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अमलदाराचे नाव व हुद्दा :

पो. नि. रुपिया नरे

2 तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ........ —

3 दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........ — , जिल्हा ........ — , राज्य ........ —

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................ Rank............ No...............
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to........ — ........ (3) Transferred to P. S. ........ — ........
District........ — ........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

Deepak

05/01/2022

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ........ श्रीमती रुपिया नरे

पदनाम Rank ........ पोलिस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड क्र. ........

Posting

Code No. of I. O. ........

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख........ 05/01/2022
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Deepak

Received FIR copy.